चंद्रगुप्त मौर्य इ.स.पू. 322 ते इ.स.पू. 298

जीवनाविषयी आपणास आढळतात. चंद्रगुप्ताच्या पित्याची हत्या एका शक्तिशाली शासकाकडून झाली. हा शासक नंदवंशीय असावा. यावेळी चंद्रगुप्ताची आई गर्भवती होती. तिने तिच्या भावासोबत पाटलीपूत्र याठिकाणी आपले वास्तव्य ठेवले. या भागात तिने आपल्या वंशास अज्ञात ठेवण्यासाठी मयूरपोषणाचा व्यवसाय केला. चंद्रगुप्ताचा जन्म झाल्यानंतर त्यांच्या आईने त्याला अज्ञात स्थळी सोडले. चंद नावाच्या वृक्षामुळे त्याचा जीव वाचला म्हणून तो पुढे चंद्रगुप्त या नावाने प्रसिध्दीस आला.

चंद्रगुप्ताच्यार कर्तृत्वाविषयी बौध्द ग्रंथामध्ये कथा मिळते सिंहलदेशाच्या राजाने मगधच्या नंद राजाकडे पिंजऱ्यात मेणाचा वाघ करून पाठवला. हा वाघ सजीव भासत होता. यासोबत असा संदेश पाठवला की जो या वाघास पिंजरा न उघडता बाहेर काढेल तो सर्वस्वी योग्य व्यक्ती मानली जाईल. सर्वांनी प्रयत्न केले, शेवटी चंद्रगुप्तने तप्त सळईच्या सहाय्याने वाघास बाहेर काढले. या कथेतील प्रतिकात्मक अर्थ हा चंद्रगुप्ताच्या कर्तृत्वाविषयी दिग्दर्शन करतो.

चंद्रगुप्त हे नंद राजाकडे नोकरी करता होते. तेंव्हा काही कारणास्तव क्रोधाने नंदराजाने चंद्रगुप्तास मृत्युदंडाची शिक्षा सुनावली चंद्रगुप्त स्वत:चा जीव वाचविण्यासाठी पळत असताना वाटेत त्याला कोपिष्ट ब्राम्हण भेटला. जो त्याच्या पायात काटा रुतल्याने तेथील सर्व गवत उपटत होता. या ब्राहमणास चंद्रगुप्ताने नंद राजाचा नाश करण्यासाठी सोबत घेतले.

चंद्रगुप्ताचे बालपण गुराख्याकडे गेले. नंतर तो शिकाऱ्याकडे राहू लागला. शिकाऱ्याकडे असताना तो राजा व अपराधी हा खेळ खेळत होता. चंद्रगुप्त हा या खेळामध्ये राजा होऊन अपरध्यास शिक्षा सुनवित होता, तेवढयात चाणक्य तेथे आला. त्याने चंद्रगुप्तामधील योग्यता ओळखून शिकाऱ्यास काही रक्कम देऊन चंद्रगुप्तास आपल्या ध्येयासाठी सोबत घेतले चाणक्याचा नंद दरबारात अपमान झाल्याने त्याने नंद नाशाचे ध्येय ठरवले होते. अशा प्रकारची चंद्रगुप्ताच्या प्रारंभिक जीवनाबाबतची संदिग्ध माहिती आपणास प्राप्त होते.

**चंद्रगुप्त मौर्याचा साम्राज्य विस्तार :**

चंद्रगुप्ताने कौटिल्याच्या सहकार्यांने या देशाला ग्रीकापासून मुक्त केले याविषयी सर्वांचे एकमत आह. परंतु त्याने प्रथम वायव्य प्रदेशावर विजय मिळविला की मगध प्रदेशावर याविषयी वेगवेगळे मत आहे. पाश्चिमात्य विचारवंताच्या मते त्याने प्रथम वायव्य प्रदेशावर ताबा मिळवला तर भारतीय ग्रंथ, महावंश टिका व परिशिष्ट पर्व या भारतीय ग्रंथामध्ये

चंद्रगुप्ताने प्रथम मगध प्रांतावर स्वारी केली ती असफल ठरल्याने त्याने सीमावर्ती प्रदेशावर हल्ले करून त्या प्रदेशावर आपला ताबा मिळविला.

**अ) नंदाशी पहिला संघर्ष :**

चंद्रगुप्त मौर्य व कौटिल्य यांनी एकत्र येऊन पैसा, सैन्य, व साधन सामग्री जमवली. त्यानंतर नंदाच्या साम्राज्याच्या मध्यभागी म्हणजे मगधावर स्वारी केली. परंतु नंद श्रेष्ठ ठरले व चंद्रगुप्तास माघार घ्यावी लागली. तेंव्हा केंद्र ठिकाणी स्वार करून चूक केल्याची जाणीव चंद्रगुप्तास झाली. त्यानंतर त्यांने नंद साम्राज्याच्या सरहद्दीवीरल नंदाना विरोध करणाऱ्या सत्तांना आपलेसे केले. यासाठी तो उत्तर भारतात गेला.

**ब) चंद्रगुप्त मौर्य व अलेक्झांडर :**

ग्रीक इतिहासकार जस्टीन यांच्या मते ग्रीक राजा अलेक्झांडर हा पंजाबकडील राजांवर हल्ले करत होता. तेंव्हा चंद्रगुप्त मौर्य उत्तरेकडे आला होता. त्यामुळे चंद्रगुप्त व अलेक्झांडर हे समकालीन असून त्यांची भेट सुध्दा झाली; परंतु त्यांचे आपसात चांगले संबंध निर्माण होऊ शकले नाही.

अलेक्झांडरच्या वर्चस्वाखाली सर्व वायव्य भारत होता. त्याने या प्रदेशाचे सहा भागात विभाजन केले. यापैकी तीन भागांचे प्रमुख म्हणून भारतीय क्षत्रप नेमले तर तीन भागांचे प्रमुख म्हणून ग्रीक क्षत्रप नेमले. त्यातीन दोन ग्रीक क्षत्रपांची भारतीय लोकांनी हत्या केली. भारतीयांमध्ये ग्रीक विषयीचा असंतोष भडकलेला असतानाच अलेक्झांडर बॅबीलोनीया येथे मृत्यू झाला. ग्रीकांविरूध्दच्या सर्व असंतुष्टांना चंद्रगुप्ताने आपल्याकडे घेतले तर वायव्य भारतावर आपले प्रभूत्व स्थापन केले.

**क) धनानंदाचा पराभव व पाटलीपुत्रवर ताबा :**

वायव्य भारतातून ग्रीकांचे वर्चस्व संपवल्यानंतर चंद्रगुप्ताने काश्मीर पर्वतराजीचा राजा प्रवर्तक याच्यासोबत युती केली. नंतर संपूर्ण तयारी करून धनानंदावर हल्ला केला. अनेक दिवस हा संघर्ष चालला शेवटी धनानंदाचा पराभव करून चंद्रगुप्ताने मगधाची राजधानी पाटलीपूत्रावर (आधुनिक पाटणा) ताबा मिळविला. सर्व प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून चंद्रगुप्ताने इ.स.पू.३२२ मध्ये स्वतःला राज्याभिषेक केला. अशाप्रकारे चंद्रगुप्त मौर्य मगध साम्राज्याच्य राजसिंहासनावर आरूढ झाला.

**ड) सिंध प्रांतावर ताबा :**

पूर्वी दोन ग्रीक क्षत्रपांची हत्या झाली होती. राहिलेला एक ग्रीक क्षत्रप युडेमास

याच्या सिंध प्रांतावर ताबा होता. चंद्रगुप्ताने सिंध प्रांतावर हल्ला करून युडेमासाचा पराभव केला व सिंध प्रांतावर ताबा प्रस्थापित केला.

**इ) सेल्युकस निकेटरचा पराभव :**

अलेक्झांडरचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या साम्राज्यावर वर्चस्व ठेवण्यासाठी त्याचे सेनापती सेल्युकस व अँटीगोनस या दोघांमध्ये संघर्ष झाला. या संघर्षात सेल्युकसने विजय मिळवून निकेटर ही पदवी धारणी केली. सेल्युकस हा बॅबीलोन व बॅक्ट्रीचा प्रदेशावर विजय मिळवून वायव्य भारताकडे निघाला.

यावेळी भारतामध्ये चंद्रगुप्त मौर्याचे साम्राज्य होते. इ.स.पू. ३०५ ते ३०३ या काळात सेल्युकस व चंद्रगुप्त मौर्य यांच्यामध्ये सिंधु नदीजवळ भयंकर रणसंग्राम झाला. यामध्ये सेल्युकसचा पराभव होऊन त्याने अपमानकारक तह स्विकारला. सेल्युकसने आपली मुलगी हेलेनाचा विवाह चंद्रगुप्ताशी लावला, आपला राजदुत मेगॅस्थेनिस चंद्रगुप्ताच्या दरबारी ठेवला. चंद्रगुप्ताने सेल्युकसला ५०० हत्ती भेट दिले. सेल्युकसला नवीन कोणताही प्रदेश घेता आला नाही. उलट अफगाणिस्थानचा काही भाग चंद्रगुप्तास द्यावा लागला.

**इ) पश्चिम भारत पादाक्रांत :**

चंद्रगुप्त मौर्यांने आपल्या साम्राज्यात सौराष्ट्र व बंगालचा प्रदेश समाविष्ट केला होता. तुहास्प व पुष्यगुप्त यांना या प्रदेशाचा राज्यपाल नेमले. जुनागढच्या अभिलेखात ही माहिती मिळते.

**उ) दक्षिण भारतावर प्रभुत्व :**

प्राचीन साहित्य, परंपरा, प्लुटार्क, जस्टीन यांनी चंद्रगुप्ताने दक्षिण भारतावर प्रभुत्व निर्माण केले असे मत मांडले. चंद्रगुप्ताने डॉ.स्मिथ यांनी बिंदुसारने दक्षिण भारत जिंकला असे मत मांडले. चंद्रगुप्ताने प्रभूत्व निर्माण केले असावे हे जास्त विश्वसनीय वाटते. त्यांने महाराष्ट्र, विदर्भ, म्हैसूर व आंध्र या प्रदेशावर प्रभुत्व निर्माण केले होते.

अशाप्रकारे स्वतःच्या कर्तृत्वाने प्राचीन भारतात चंद्रगुप्ताने साम्राज्य निर्मिती केली. त्याचे साम्राज्य हिंदकूश पर्वतापासून बंगालपर्यंत व हिमालयापासून उत्तर म्हैसूरपर्यंत पसरलेले होते. एवढे विशाल साम्राज्य निर्माण करणारा तो पहिला चक्रवर्ती सम्राट होय.

**चंद्रगुप्त मौर्याचा शेवट :**

चंद्रगुप्त मौर्याचा शेवट कसा झाला यासंबंधी जैन परंपरेत माहिती मिळते. २४ वर्षे राज्य केल्यानंतर चंद्रगुप्ताने राजत्याग इ.स.प. २९८ मध्ये केला. त्याने सर्वसंग परित्याग

करून जैन आचार्य भद्रबाहू यांच्यासोबत दक्षिणेतील कर्नाटकाकडे प्रस्थान केले. तेथे एका पर्वतावर त्यांनी ध्यानधारणा केली. श्रावणबेळगोळ येथे अन्न-पाणी यांचा त्याग करून त्याने इहलोकीची यात्रा संपविली. आजही तो पर्वत चंद्रगिरी या नावाने चंद्रगुप्त मौर्याच्या तेथील मृत्युमुळे ओळखला जातो.

**चंद्रगुप्त मौर्याची योग्यता :**

चंद्रगुप्त मौर्याने प्राचीन भारतात सर्वप्रथमच एवढे विशाल साम्राज्य निर्माण केले. या साम्राज्यावर त्याने २४ वर्षे राज्य केले. त्यामुळे प्राचीन भारतातील तो पहिला सर्वश्रेष्ठ सम्राट ठरतो.

**१. श्रेष्ठ दर्जाचा सेनापती :**

चंद्रगुप्त मौर्य हा सैनिकांचा आवडता होता. तो सर्व प्रकारची युध्दकला जाणत होता. तो सैन्याची देखरेख स्वतः करीत असे. नंदाविरूध्द विजय, ग्रीकांविरूध्द विजय, पश्चिम भारत, दक्षिण भारत यावरील प्रभुत्व हे त्याच्या उच्च कोटीच्या लष्करी गुणांची साक्ष देतात. म्हणून तो श्रेष्ठ दर्जाचा सेनापती होता.

**२. साम्राज्य निर्माता :**

अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये चंद्रगुप्ताने राज्य निर्मितीच्या ध्येयाने साम्राज्याचा पाया घातला. त्यांने नंद, ग्रीक, पश्चिम भारत, दक्षिण भारत या सत्तांना परास्त करून विशाल अशा साम्राज्यावर आपला अधिकार स्थापन केला. त्याचे राज्य हिंदकूश ते बंगाल व हिमालय ते म्हैसूर पसरलेले होते. म्हणून तो पहिला साम्राज्य निर्माता होय.

**३. सर्वोत्कृष्ट प्रशासक :**

चंद्रगुप्त हा केवळ विजेताच नाही तर उत्कृष्ट प्रशासक होता. त्याने राज्यविस्तारासोबतच त्या राज्यावर आपल्या प्रशासनाने अबाधित वर्चस्व राखले. त्याने निर्माण केलेले प्रशासन एककेंद्री व उत्कृष्ट होते. जे त्याच्या नंतरच्या काळातही लागू होते. कायदेकारी, कार्यकरी व न्याय या तीनही शाखांचा तो प्रमुख होता. त्याच्या सर्वोत्कृष्ट प्रशासनामुळे प्रजेचे अंतर्गत व बहिर्गत शत्रुपासून त्यांने संरक्षण केले. संपूर्ण साम्राज्यात शांतता व समृध्दी निर्मितीचे श्रेय त्याच्या प्रशासनास जाते.

**४. सुधारणावादी राजा :**

साम्राज्यनिर्मिती सोबतच चंद्रगुप्त मौर्याने सुधारणाकडेही लक्ष दिले. रस्ते, कृषी, पाटबंधारे, दवाखाने, लोककलयाणकारी उपक्रम या सर्व क्षेत्रांमध्ये त्याने सुधारणा केल्या.

लोकांच्या कल्याणाच्या अनेक योजना त्याने राबवल्या. त्यामुळे तो सुधारणावादी राजा होता हे स्पष्ट होते.

५. **न्यायप्रेमी राजा :**

न्यायदान प्रक्रियेत त्याने स्वत: लक्ष केंद्रीत केले होते. तो ठराविक दिवशी न्यायदानाचे कार्य करीत असे. सर्वांना समान व तत्काळ न्याय मिळाला पाहिजे असे त्याचे धोरण होते. यामुळे प्रजा त्याच्यावर जीवापाड प्रेम करत होती.

६. **कुशल राजनीतीज्ञ :**

विशाल साम्राज्याची निर्मिती केल्यानंतर त्यावर उत्कृष्ट प्रशासनाने नियंत्रण ठेवण्याचे कार्य चंद्रगुप्ताने केले. स्वत:चे संरक्षण व आपल्याविरूध्द कट होणार नाही याची तो काळजी घेत असे सेल्युकस कडून अफगाणिस्थानचा प्रदेश घेऊनही त्यास आपल्या विरोधात त्याने जाऊ दिले नाही. असे अनेक राजे होते ज्यांचे राज्य चंद्रगुप्ताने जिंकले परंतु त्या राजांना आपल्या विरोधात जाऊ दिले नाही. त्यामुळे तो कुशल राजनितिज्ञ ठरतो.

७. **विद्या व कलेचा आश्रयदाता :**

चंद्रगुप्ताने २४ वर्षे राज्य केले. उत्कृष्ट प्रशासनाद्वारे साम्राज्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. त्याच्या दरबारात चाणक्य, मेगॅस्थेनिस इ. विद्वान होते. तत्कालीन शिक्षणाची व्यवस्था त्याच्या साम्राज्यात होती. त्याने आपल्या सर्व पुत्रांना आवश्यक ते शिक्षण दिले. सूबक नाणी त्याने तयार केली होती. स्थापत्य अवशेष चंद्रगुप्तकालीन स्थापत्य अवशेष आपणास प्राप्त होतात. वरील सर्व गुणांमुळे व मौर्य साम्राज्याचा संस्थापक म्हणून चंद्रगुप्त हा सर्वोत्तम राजा होता.

**मेगॅस्थेनिसच्या इंडिकातील भारताचे वर्णन :**

मेगॅस्थेनिस हा सेल्युकसचा राजदूत म्हणून चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात होता. तो ५ वर्षे भारतामध्ये मौर्य साम्राज्यात वास्तव्यास होता. त्याने जे पाहिले ते त्याला जसे वाटले तसे शब्दबद्ध केले आहे. या ग्रंथास त्यांने ' इंडिका' असे नाव दिले. त्यामध्ये पुढीलप्रमाणे माहिती आहे.

भारत या महाद्विपाचा आकार चौकोनी असून त्याच्या उत्तर सीमेवर पर्वत, पूर्व दक्षिणेस समुद्र व पश्चिमेस गंगा आहेत. भारतात उन्हाळा व हिवाळा हे दोन ऋतू असून दोन्हीमध्ये पाऊस पडतो.

भारतीयांचे सामाजिक जीवन हे अतिशय चांगले आहे. येथील लोकांची साधी